## इंडो-नेपाल इंटरनॅशनल टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत स्वप्नील जितेंद्र गोंड याला सुवर्ण पदक

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.२४ :** येथील सरदार पटेल महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागातील खेळाडू स्वप्नील जितेंद्र गोंड यांनी आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत इंडो-नेपाल इंटरनॅशनल टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले आहे. ही प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धा नुकतीच नेपाळ देशातील पोखरा येथे पार पडली.भारत व नेपाल या दोन देशांतील नामांकित आणि अनुभवी संघांच्या सहभागाने ही स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरली. अशा उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्वप्नील गोंड यांनी आपल्या उत्कृष्ट खेळकौशल्याचे, आत्मविश्वासाचे प्रभावी प्रदर्शन करत सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले. त्यांच्या या दैदीप्यमान यशामुळे सरदार पटेल महाविद्यालय तसेच संपूर्ण जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढला आहे.दरम्यान सर्वोदय



शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणाताई तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य, राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, जिनेश पटेल यांनीही स्वप्नील गोंड यांचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# काँग्रेसच्या अंतर्गत वादामूळे सत्तास्थापनेसाठी भाजपाच्या हालचालींना वेग

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.२४ :** काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत वादाचा फटका महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी बसण्याची शक्यता वाढली असून, याच संधीचा फायदा घेत भाजपाने हालचालींना वेग दिला आहे. गटनेतेपद, महापौर पदाची उमेदवारी आणि सत्तास्थापनेची रणनीती यावरून काँग्रेसच्या नेत्यांमध्ये तीव्र मतभेद उफाळून आले आहेत.

मागील तीन दिवसापासून काँग्रेसमध्ये आ.विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या गटातील गटनेता नोंदणी संदर्भातील नाट्यमय घडामोडीवर काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या हस्तक्षेपामूळे तोडगा निघाला.महापौरपद खा.धानोरकर व स्थायी समिती सभापती पद आ.वडेट्टीवार ठरविणार आहेत.तसेच महापौरासह सत्तास्थापनेसाठी लागणारे संख्याबळ जुळविण्याची जबाबदारी खा.धानोरकर यांचेकडे देण्यात आली आहे.

मनपा निवडणुकीत काँग्रेसकडे २७ व भाशेकाप ३ असे एकूण ३० जागा काँग्रेसकडे आहे.पप्पू देशमूख यांनी एमआयएमला सोबत घेवून चार जणांची गट नोंदणी केली.तसेच महाविकास आघाडीतील काँग्रेसचा मित्र पक्ष शिवसेना (उबाठा) यांचेकडे ६ जागा आहेत.वंचितकडे २ जागा आहे.शिवसेना (उबाठा) व वंचित ने मिळून ८ जाणांची स्वतंत्र गट नोंदणी केली आहे.यामूळे काँग्रेसला संख्याबळ जुळविण्यासाठी मित्र पक्षांना महत्वाची पदे सोडावी लागण्याची शक्यता आहे.आ.वडेट्टीवारांनी दोन पाऊल मागे घेत सत्तास्थापनेसाठी खा.धानोरकर यांचेकडे जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले.

काँग्रेस पक्षश्रेष्ठींच्या हस्तक्षेपामूळे सर्व आलबेल होवून तोडगा निघाला असल्याचे स्पष्ट केले असलेतरी गटनोंदणीत सामील नसलेल्या १४ नगरसेवकांमध्ये खदखद आहे.खा.धानोरकराच्या गटातील १३ नगरसेवकांना घेवून धानोरकरांनी गट नोंदणी करुन गटनेता केला.यामूळे काँग्रेसच्या उर्वरित १४ नगरसेवकांना तांत्रिक दृष्ट्या दुसरागट नोंदणी करणे अशक्य आहे.त्यांना शपथपत्र देवून धानोरकरांच्या गटात सामील होण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले जात आहे.

काँग्रेसमधील दोन प्रमुख गटांमध्ये समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. या परिस्थितीचा फायदा घेत भाजपाने सत्तास्थापनेसाठी आघाडी बांधण्याचे प्रयत्न तीव्र केले आहेत. भाजप पक्षातील नेते, अपक्ष तसेच लहान पक्षांच्या नगरसेवकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केल्याची माहिती समोर येत आहे. संख्याबळ जुळविण्यासाठी बंद खोलीतील बैठका, वैयक्तिक भेटीगाठी आणि राजकीय गणिते वेगाने मांडली जात आहेत.

### शिवसेना (उबाठा) ६, वंचित २ व अपक्ष २ मुंबईला रवाना

महापौर किंवा स्थायी समिती सभापती पद पदरात पाडून घेण्यासाठी शिवसेना (उबाठा), वंचित व अपक्ष असे १० नगरसेवक मुंबई ला रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.सर्व १० नगरसेवक वंचित चे प्रकाश आंबेडकर व शिवसेना (उबाठा) चे उध्दव ठाकरे यांची भेट घेणार आहेत.१० नगरसेवकांच्या एकत्रितपणामूळे नवे वळण समोर येत आहे.दुसरीकडे भाजपाकडे २३ व शिवसेना (शिंदे) १ असे एकूण २४ चे संख्याबळ आहे.बहुमतसाठी ३४ ची आवश्यकता आहे.यामूळे भाजपा या १० जणांच्या संपर्कात असल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे.




### बार्गेनिंग पावर वाढविण्यासाठी गट नोंदणी

महापालिकेतील सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महानगर आघाडी ने आपआपली 'बार्गेनिंग पावर' वाढविण्यासाठी गट नोंदणी केल्याने राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची झाली आहेत. सत्तास्थापनेत निर्णायक भूमिका बजावता यावी, यासाठी शिवसेना (उबाठा) व वंचित मिळून आणि भाशेकाप (पप्पू देशमूख) व एमआयएम मिळून स्वतंत्र गट म्हणून विभागीय आयुक्तांकडे नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली.सूत्रांच्या माहितीनुसार, महापौर, उपमहापौर तसेच स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी होणाऱ्या वाटाघाटींमध्ये अधिकाधिक राजकीय लाभ मिळावा, यासाठी ही रणनीती आखण्यात आली आहे. कोणत्याही पक्षाला पाठिंबा देताना अटी-शर्ती ठरविता याव्यात, तसेच सत्तेत सहभागाची ठोस हमी मिळावी, हा या गट नोंदणीमागचा प्रमुख हेतू असल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, काँग्रेस आणि भाजप दोन्ही पक्षांकडून या गटांशी संपर्क वाढविण्यात आला असून, पाठिंब्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शिवसेना (उबाठा) आणि महानगर आघाडी (पप्पू देशमूख) कोणाच्या बाजूने झुकतात, यावर सत्तास्थापनेचे गणित ठरणार असल्याने दोन्ही गट सध्या 'किंगमेकर'च्या भूमिकेत दिसून येत आहेत.राजकीय जाणकारांच्या मते, गट नोंदणीमुळे या पक्षांची सौदेबाजीची ताकद वाढली असून, सत्तास्थापनेच्या अंतिम टप्प्यात त्यांची भूमिका निर्णायक ठरण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आगामी काही दिवस चंद्रपूरच्या राजकारणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

## ऑनलाईन गेमिंगचा विळखा

# कर्जबाजारी झाल्याने २५ वर्षीय तरुणाची आत्महत्या

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी दि.२४ :** ऑनलाईन गेमिंगच्या व्यसनाने पुन्हा एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आधार हिरावून घेतला आहे. ब्रह्मपुरी तालुक्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या खंडाळा येथील रोहित रवींद्र हरडे (वय २५) या तरुणाने ऑनलाईन गेममध्ये झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे आणि कर्जाला कंटाळून राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज, २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहित हा ब्रह्मपुरी येथील एका राईस मिलमध्ये ऑपरेटर म्हणून काम करत होता. त्याला गेल्या काही काळापासून ऑनलाईन गेमिंगचे व्यसन जडले होते. या खेळात तो मोठ्या प्रमाणावर पैसे हरला होता, त्याच्यावर कर्जाचा डोंगर साचला होता. याच विवंचनेतून त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आज शनिवारी सकाळच्या सुमारास, नेहमीप्रमाणे आई-वडिलांनी रोहितला उठवण्यासाठी त्याच्या खोलीचा दरवाजा ठोठावला. मात्र, आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय बळावल्याने ग्रामस्थांच्या मदतीने खोलीचा दरवाजा तोडण्यात आला. यावेळी रोहित गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला, ज्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच ब्रह्मपुरी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेहाचा पंचनामा करून तो उत्तरीय तपासणीसाठी ब्रह्मपुरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविला आहे. एका होतकरू तरुणाने अशा प्रकारे जीवनयात्रा संपवल्याने खंडाळा गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

ऑनलाईन गेमिंग हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते एक घातक व्यसन ठरू शकते. तरुणांनी अशा खेळांच्या आहारी जाऊ नये आणि पालकांनीही आपल्या मुलांच्या मोबाईल वापराकडे लक्ष द्यावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# महिलांनी आत्मविश्वासाने पुढे यावे

## हळदीकुंकू कार्यक्रम : नगराध्यक्षा सौ.अलका अनिल वाढई



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**बल्लारपूर दि.२४ :** बल्लारपूर काँग्रेस कमिटीच्या वतीने कोर्टीमत्ता येथे आयोजित करण्यात आलेल्या हळदीकुंकू कार्यक्रमात कोर्टीमत्ता, कोर्टीतुकूम तसेच कोर्टी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बल्लारपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सौ. अलका अनिल वाढई उपस्थित होत्या. यावेळी काँग्रेस कमिटीच्या शहर अध्यक्षा तसेच महिला व बालकल्याण सभापती मेघा भाले, तालुका ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गोविंद उपरे, महिला काँग्रेस अध्यक्षा अफसाना सय्यद मॅडम, काँग्रेस नेते व सामाजिक कार्यकर्ते भास्कर कावळे, सौ. सोनाली भास्कर कावळे, सामाजिक कार्यकर्ते राजू मेश्राम, किन्हीचे माजी सरपंच वासुदेव येरगुडे तसेच तालुका काँग्रेस उपाध्यक्षा सौ. नाजुका हनुमान आलाम यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिलांना भेटवस्तू देऊन हळदीकुंकूचा कार्यक्रम आनंदात साजरा करण्यात आला. महिलांमध्ये सामाजिक एकोपा वाढविणे, सन्मानाची भावना निर्माण करणे तसेच सांस्कृतिक परंपरेचे जतन व संवर्धन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा सौ. अलका अनिल वाढई यांनी महिलांनी आत्मविश्वासाने सामाजिक व सार्वजनिक जीवनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. उपस्थित अन्य मान्यवरांनीही महिलांच्या सशक्तीकरणावर आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. सोनाली भास्कर कावळे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन तालुका काँग्रेस उपाध्यक्षा सौ. नाजुका हनुमान आलाम यांनी केले, तर आभार प्रदर्शन भास्कर कावळे यांनी केले.

महिलांच्या सशक्तीकरणाचा ठोस संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला असून, महिलांना सामाजिक सहभाग, आत्मसन्मान आणि संघटनशक्तीची जाणीव करून देणारा ठरला. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, काँग्रेस कमिटीच्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरात विशेष स्वागत करण्यात येत आहे.

# अवैध वृक्षतोडीविरोधात ग्रामपंचायत सदस्यांचा आक्रमक पवित्रा

## सास्ती ग्रामपंचायत परिसरातील तीन वृक्ष विनापरवानगी तोडल्याचा आरोप



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**राजुरा दि.२४ :** ग्रामपंचायत सास्ती परिसरात विनापरवानगी करण्यात आलेल्या वृक्षतोडीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, याप्रकरणी ग्रामपंचायत सदस्य मधुकर परशुराम झाडे यांनी ग्रामसेवकांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बेहडा व बदाम जातीच्या एकूण तीन वृक्षांची दि. २० जानेवारी २०२६ रोजी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता तोड करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सदर वृक्षतोड महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ च्या स्पष्ट उल्लंघनात होत असल्याचे नमूद करत, संबंधित ठिकाणी तात्काळ भेट देऊन पंचनामा करण्याची तसेच ज्या कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही बेकायदेशीर वृक्षतोड झाली, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.ग्रामपंचायत परिसरातील वृक्ष हे केवळ सौंदर्यवर्धनापुरते मर्यादित नसून, पर्यावरण संतुलन, शुद्ध हवा व नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचेही तक्रारीत अधोरेखित करण्यात आले आहे. त्यामुळे अशा प्रकारांकडे दुर्लक्ष न करता प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. या घटनेमुळे सास्ती गावात पर्यावरण संरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, प्रशासन आता काय भूमिका घेते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### चंद्रपूरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा

**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.२४ :** शहरातील मोकाट कुत्र्यांचा हैदोस सुरु असून अनेक नागरिकांचा या मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला आहे. लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांचा चावा या मोकाट कुत्र्यांनी घेतल्याने नागरिकांमध्ये दहशत आहे. तेव्हा नगरसेवक व माजी उपमहापौर राहुल पावडे यांनी मनपा आयुक्तांना सदर बाब दूरध्वनी द्वारे कळवले आहे.मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली आहे.

शहरातील झपाट्याने वाढत असलेल्या मोकाट कुत्र्यांमुळे शहरातील व प्रभागात भीतीचे वातावरण पसरले असून यामध्ये लहान मुलांपासून तर ज्येष्ठ नागरिक फिरण्याकरिता जात असतात. आज पर्यंत अनेक ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचा मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला असून याचा नेमका आकडा महनगरपालिकेकडे असेलच परंतु यापुढे अशा घटना होऊ नये यासाठी खबरदारीची काळजी घ्यावी, महानगरपालिकेच्या यंत्रणेद्वारा मोकाट कुत्र्यांवर आळा घालावा आणि सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, यावर कठोर निर्णय घेत शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस करा अशी मागणी नगरसेवक तथा चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर राहुल पावडे यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

# रिप.खोरीपाचे शहर अध्यक्ष प्रशांत डांगे २६ जानेवारी पासून उपोषणाला बसणार



**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी दि.२४ :** शहरात विकासाच्या नावाखाली संथ गतीने होत असलेल्या कामामुळे नागरिकांचे बेहाल होत आहेत. या त्रासाला कंटाळून कंत्राटदारांच्या वेळखाऊ भूमिकेचे व संबंधित विभागाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष यांच्या विरोधात विविध मागण्या घेऊन रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे शहर अध्यक्ष प्रशांत डांगे येत्या २६ जानेवारी २०२६ ला आमरण उपोषणाला बसणार आहेत.

ब्रम्हपुरी वडसा महामार्गाचे गेल्या दहा महिन्यापासून कासव गतीने रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरु आहे.संबंधित ठेकेदाराने काम सुरु करताना संपूर्ण रस्ताच पोखरून काढल्याने प्रवाशांना तसेच नागरिकांना विध्यार्थ्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.त्या कामामुळे धुळीचे साम्राज्य निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे .रस्त्यावर खड्डे व रस्ता पूर्णपणे उखरल्याने रोज अपघात होऊन अनेक नागरिक गांभीर जखमी झालेत.तसेच ब्रम्हपुरी - आरमोरी रोड वरील बनत असलेल्या उड्डाणं पुलाचेही काम संथ गतीने सुरु असून नागरिकांना प्रवास करताना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे.नागरिक दिन्ही कामाच्या संथ गतीला पाहून नागरिकामध्ये कंत्राटदाराबद्दल चिड निर्माण होऊन ब्रम्हपुरीकर त्रासलेले आहेत. नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन रिपब्लिकन पक्ष खोरीपा चे शहर अध्यक्ष प्रशांत डांगे हे येत्या २६ जानेवारी २०२६ रोजी दोन्ही कामाला गती मिळावी व नागरिकांना दिलासा मिळावा व अन्य मागण्या घेऊन आमरण उपोषणाला बसणार आहेत.त्यांच्या या लोक हिताच्या निर्णयाला शहरातील अनेक त्रस्तनागरीक लोकांनी उपोषणाला पाठिंबा दिला आहे.अशी माहिती खोरिपाचे तालुका सरचिटणीस पद्माकर रामटेके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# लोकमान्य विद्यालय भद्रावतीत 'एक भारत श्रेष्ठ भारत' चे भव्य दर्शन

**युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती दि.२४ :** लोकसेवा मंडळ, भद्रावती संचालित लोकमान्य विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयाच्या प्रांगणात आणि शहरातून 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उदात्त संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी साकारलेला भारताचा जिवंत नकाशा तसेच भारत दर्शन शोभायात्रा हे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरले.

विद्यालयाच्या प्रांगणात मैदानावर भव्य भारताचा नकाशा रेखाटून देशातील विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीतील 'अनेकतेतील एकता' ही संकल्पना रंगीबेरंगी आणि प्रभावी स्वरूपात साकारली. विविध राज्यांची संस्कृती, परंपरा व लोककला विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सादरीकरणातून जिवंत केली. रंगीबेरंगी पारंपरिक पोशाखांमुळे संपूर्ण नकाशा जणू सजीव झाल्याचे दृश्य उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते. या अनोख्या उपक्रमाचे उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.यानंतर

## विद्यार्थ्यांनी साकारला भारताचा जिवंत नकाशा व भारत दर्शन शोभायात्रा

अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने भारत दर्शन शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. शोभायात्रेची सुरुवात मंगल शंखनाद व पारंपरिक वाद्यांच्या गजरात भारत मातेला वंदन करून झाली. शोभायात्रेच्या उद्घाटनप्रसंगी लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत गुंडावार, सचिव उल्हास भास्करवार, शाळा समिती अध्यक्ष गोपाल ठेंगणे, प्रमुख अतिथी डॉ.प्रवीण केशवानी, अविनाश सिद्धमशेट्टीवार, नकुल शिंदे, माजी सचिव नामदेवराव कोल्हे, सहसचिव अमित गुंडावार, सदस्य आशिष गुंडावार, संजय पारधे, उमाकांत गुंडावार, कार्यक्रम समन्वयक प्रा. सचिन सरपटवार, प्राचार्य रूपचंद धारणे, पर्यवेक्षक आशुतोष सुरावार, ज्ञानपीठच्या प्राचार्या पुनम ठावरी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.शोभायात्रेत विविध राज्यांच्या पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थी, लोकसेवा मंडळाचे पदाधिकारी,



शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी फेटे परिधान करून सहभागी झाले होते. विद्यालयापासून मुख्य रस्त्यावरून काढण्यात आलेल्या या शोभायात्रेवर ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पवर्षाव करून स्वागत केले. मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना हारार्पण करण्यात आले.

शोभायात्रेत राज्यनिहाय भारत दर्शन साकारण्यात आले. महाराष्ट्राची शौर्य परंपरा, संतसंस्कृती व सामाजिक समता, गुजरातचा व्यापार व उत्सवप्रिय स्वभाव, राजस्थानचा शौर्य व लोककला वारसा, पंजाबमधील शेतकऱ्यांची मेहनत व शूरवीरांची भूमी, हरियाणाची क्रीडापरंपरा, उत्तर प्रदेशची रामभूमी व गंगा-यमुनेची संस्कृती, बिहारचे ज्ञानपरंपरेतील योगदान, मध्य प्रदेश भारताचे हृदयस्थान, छत्तीसगडची आदिवासी लोकसंस्कृती व निसर्गसौंदर्य अशा विविध राज्यांचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडविण्यात आले.विविध भाषा, वेशभूषा, नृत्य आणि संगीत असूनही 'आपण सर्व भारतीय आहोत' ही एकात्मतेची भावना या शोभायात्रेतून प्रभावीपणे व्यक्त झाली. अखेरीस सर्व राज्यांचे प्रतिनिधित्व करणारे विद्यार्थी एकत्र येऊन एकता, बंधुभाव व शांततेचा संदेश देत होते. भारत मातेच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, संस्कृतीबद्दल आदर व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणारा ठरला.

# डॉ.मृणाली सचिन निंबाळकर आचार्य पदवी व सुवर्ण पदकाने सन्मानित



**युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी**

**चंद्रपूर दि.२४ :** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे १३ व्या दीक्षांत समारंभाचे आयोजन बुधवार दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सर्च या समाजसेवि संस्थेचे संस्थापक, पद्मश्री पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र भूषण श्री. डॉ. अभयजी बंग, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे सर तसेच गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे सर आदींची उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांचे हस्ते सौ. डॉ. मृणाली सचिन निंबाळकर (मृणाली नानाजी वसाके) यांना इतिहास विषयात आचार्य पदवी तसेच सुवर्ण पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यांनी आपल्या यशाचे श्रेय सरदार पटेल महाविद्यालयाचे डॉ. मोहारे सर, डॉ. शेंडे सर, पती सचिन भय्याजी निंबाळकर, आई-वडील आणि सासू-सासरे यांना दिले आहे. या सन्मानाबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
रविवार दि.२५ जानेवारी २०२६

## जिल्ह्यात अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

**भंडारा:** जिल्ह्यात सिकलसेल ॲनिमियाया अनुवांशिक आजाराविषयी जनजागृती वाढविणे तसेच वेळेत तपासणी व उपचार सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या संयुक्त पुढाकारातून हे अभियान प्रभावीपणे सुरू असून ग्रामीण व आदिवासी भागांवर विशेष भर देण्यात आला आहे.या अभियानांतर्गत शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, गर्भवती महिला तसेच ० ते ४० वयोगटातील नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात येत आहे. विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व गावपातळीवर आरोग्य शिबिरे आयोजित करून मोफत तपासणी, समुपदेशन व आवश्यक उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. सिकलसेल ॲनिमिया हा आजार वेळेवर निदान झाल्यास त्याचे दुष्परिणाम टाळता येतात, यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून घरोघरी जनजागृती केली जात आहे. आजाराची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना व उपचार पद्धती याबाबत नागरिकांना सविस्तर माहिती दिली जात आहे.सावन कुमार जिल्हाधिकारी भंडारा यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या विशेष अभियानाचा लाभ घ्यावा व तपासणी करून घ्यावी.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# आमदार डॉ. परिणय फुके यांच्या अध्यक्षतेखाली गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनेबाबत कार्यशाळा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :-** शेतकरी हित, मृद व जलसंधारण आणि शेती उत्पादन वाढीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज भंडारा जिल्हा नियोजन समिती सभागृहात नियोजनात्मक कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान आमदार डॉ. परिणय फुके यांनी भूषविले.

ही योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांची महत्त्वाकांक्षी संकल्पना असून, केवळ पाणी साठवण वाढविणेच नव्हे तर शेतक-यांच्या शेतात गाळ टाकून जमिनीची सुपीकता वाढवून उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीनेही ही योजना अत्यंत उपयुक्त असल्याचे आ. डॉ. परिणय फुके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले.



कार्यशाळेत तलाव व धरणांमधील गाळ काढण्याची संपूर्ण प्रक्रिया, त्या गाळाचा शेतक-यांच्या शिवारात वैज्ञानिक पद्धतीने वापर केल्यास जमिनीतील सेंद्रिय घटक कसे वाढतात, पिकांची उत्पादकता कशी सुधारते तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरणामुळे पावसाचे पाणी अडवून भूजल पातळी कशी वाढविता येईल व पूर्वपरस्थितीवर मात करता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

ही योजना मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येत असून, यामध्ये ग्रामपंचायती, सरपंच, सचिव, तसेच स्थानिक अशासकीय संस्थांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असल्याचे आ. डॉ. परिणय फुके यांनी नमूद केले. प्रत्येक गावाने गरजेनुसार नियोजन करून प्रस्ताव सादर करावेत, कामे वेळेत सुरू करावीत आणि कोणत्याही अडचणी उद्भवल्यास तातडीने प्रशासनाच्या निदर्शनास आणाव्यात, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

गाळ काढण्याच्या कामात येणा-या तांत्रिक, प्रशासकीय व समन्वयाच्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच गाळयुक्त शिवार योजनेची प्रलंबित कामे त्वरित सुरू करण्याचे आदेश संबंधित अधिका-यांना देण्यात आले. २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यातील ६५ तलावातून जवळपास ५ लक्ष घ.मी. गाळ काढण्यात आल्याने पाणीसाठ्यात वाढ झालेली आहे, हे विशेष.

या कार्यशाळेस श्री. मिलिंदकुमार साळवे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, श्री. योगेंद्र सिंह, उपवनसंरक्षक, श्री. अनंत जगताप, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर; श्री. राजेंद्र कुमार जाधव, अतिरिक्त जिल्हाधिकारी, भंडारा; भंडारा; श्री. महेश सेलुकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी, भंडारा; श्री. सुमित नागदेवे, सहा. जिल्हा जलसंधारण अधिकारी तसेच श्री. प्रफुल्ल सुतार (टाटा मोटर्स) यांच्यासह जिल्ह्यातील ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक व विविध अशासकीय संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा संक्षिप्त वार्ता



### सुभाष वार्डात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी

**भंडारा :** शहरातील शुक्रवारी परीसरातील सुभाष वार्ड येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजक नेताजी सुभाषचंद्र बोस युवा फाऊंडेशनचे पदाधिकारी अतुल भाजीपाले, योगेश वंजारी, विरेंद्र बावनकुळे, प्रमोद केसलकर, दिलीप साठवणे, अश्विन बांगळकर, निरंजन बावनकुळे, प्रज्वल पडोळे, हर्षल मानापुरे, अंकुश कंळबे, रामभाऊ वंजारी, भाऊरावजी येळणे, वासुदेव भुरे होते.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष मधुरा मदनकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रभागातील नगरसेवक व भंडारा शहरातील सर्व नगरसेवक व माजी नगरसेवक व प्रभागातील नागरीक उपस्थित होते.



### गोंडवाना समुदायाकडून संमेलनाचे आयोजन

**गर्रा बघेडा :** तुमसर तालुक्यातील गर्रा बघेडा येथे कोयापुनेम संमेलन गोंडवाना समुदाय कडून घेण्यात आले. ह्याप्रसंगी ध्वजारोहन मरस्कोले भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक उईके हे होते तर उद्घाटक जिल्हा परिषद सदस्य संदीप प्रमुख पाहुणे पंचायत समिती सदस्य राजेश ठाकूर, उपसरपंच दीपक चौधरी, माजी नगरसेवक लक्ष्मीकांत सलामे, माजी सरपंच प्रतिभा ठाकुर, रामेश्वर राहांगडाले, अतुल चोटमोर, ग्रामपंचायत सदस्य सिध्दार्थ घोडीचोर संतोष राहांगडाले, गजानंन ठाकुर निलेश जिवतोडे, महाराष्ट्र ग्रामीण बॅक कॅशियर नानु कंगाली, समितीचे अध्यक्ष भिमराज अडमाची, मनोज सय्याम, मुरली अडमाची उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुरेंद्र सिरसाम तर आभार प्रदर्शन माजी धर्मेंद्र ईळपाचे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरता गोंडवाना बिरसा युवा समिती गर्रा बघेडा येथील सर्व समाज बांधव पुरुष महीला आणि सर्व पदाधिकारीनी सहकार्य केले.

# संविधान म्हणजे व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा अधिकार - ई.झेड. खोब्रागडे

## जिल्ह्यातील २२४४ विद्यार्थ्यांचा राज्यस्तरीय सत्कार





युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** राज्यस्तरीय संविधान गुणगौरव बक्षिस वितरण आणि सन्मान सोहळा जिल्हा परिषद सभागृह भंडारा येथे गुरुवारी संपन्न झाले. यावेळी संविधान म्हणजे व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा अधिकार होय, समाजात वावरतांना संविधानाची मूलभूत कर्तव्य व्यवहारात दिसली पाहिजे. असे माजी सनदी अधिकारी ई.झेड. खोब्रागडे यांनी मार्गदर्शन केले.

सुजाण नागरिक मंचतर्फे गत पाच वर्षापासून २६ नोव्हेंबरला राज्यस्तरीय संविधान गुणगौरव परीक्षेचे आयोजन केले जाते. यावर्षी जिल्ह्यातील २२४४ विद्यार्थी, केंद्रप्रमुख, तालुका समन्वयक, जिल्हा समन्वयक, तथा संविधान ज्ञानदाता यांनी परीक्षेत सहभाग घेतला.

ते पुढे बोलतांना म्हणाले, संविधानाचे पावित्र्य अबाधित ठेवण्यासाठी माणसाने, माणसाशी,माणुसकीने वागण्याची गरज आहे. संविधान कोण्या एका व्यक्तीचे नसून संपूर्ण भारताचे आहे. त्यामुळे संविधानाचे जतन करण्याची जबाबदारी सर्व नागरिकांची आहे. संविधान वाचून शासन, प्रशासन, न्यायालय आणि मीडियालाही सामान्य जनतेचे प्रश्न विचारता आल्यास संविधान सुरक्षित आहे. यावेळी वर्धा येथील प्रसिद्ध नाटककार प्रकाश कांबळे यांनी 'आम्ही भारताचे लोक' एकपात्री नाट्य प्रयोगाचे सादरीकरण करून संविधानाचे महत्व सांगितले.

**प्रत्येक गटात रोख बक्षीस**

५ ते ७ प्राथमिक, ८ ते १० माध्यमिक, ११ ते १२ उच्च माध्यमिक, १२ च्या पुढे खुला अशा चार गटात परीक्षा घेण्यात आली. प्रत्येक गटातून प्रथम क्रमांक ५०००, द्वितीय ३०००, तृतीय २००० व प्रोत्साहनपर १०००/असे रोख बक्षीस तसेच इतर सर्व उत्तीर्ण विध्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

संचालन विनयकुमार सोनवणे, प्रास्ताविक नूरखा पठाण आणि मालाताई मेश्राम यांनी आभार मानले. यावेळी माजी सनदी अधिकारी तथा संविधान फाउंडेशनचे संस्थापक ई.झेड. खोब्रागडे, शिक्षणाधिकारी माध्यमिक मनीषा गजभिये, सामाजिक कार्यकर्ता अमृत बनसोड, सुजान नागरिक मंच रायगडच्या संचालिका शबनम पठाण, बिलास पवार, संदेश कुलकर्णी, संविधान गुणगौरव परीक्षाचे अध्यक्ष अनिल मेश्राम, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. युवराज खोब्रागडे, नूरखा पठाण, रंजना कांबळे, सरस्वती गायकवाड, विनयकुमार सोनवणे, किशोर चव्हाण, मालाताई मेश्राम, रवींद्र वानखेडे, माधुरी सपकाळे इत्यादीं प्रामुख्याने उपस्थित होते.

## वरठी येथे पार्श्व आयुर्वेदिक क्लिनिक अँड पंचकर्म सेंटर चे उद्घाटन

### सौ. शुभांगी सुनील मेंढे व आमदार राजूभाऊ कारेमोरे यांच्या हस्ते उद्घाटन.

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**वरठी :** येथील पार्श्व आयुर्वेदिक क्लिनिक अँड पंचकर्म सेंटरचे भव्य उद्घाटन सौ. शुभांगी सुनील मेंढे व आमदार राजूभाऊ कारेमोरे, यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले. कार्यक्रमास श्री. मुकेश गोमासे, श्री. भगवान चांदेवार, स्थानिक मान्यवर, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच आरोग्य क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



डॉ. जानवी संगीता मनोज सुखानी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या आयुर्वेदिक व पंचकर्म केंद्राच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना आयुर्वेदाच्या शास्त्रीय परंपरेनुसार आधुनिक जीवनशैलीतून उद्भवणा-या विविध आजारांवर प्रभावी, सुरक्षित व नैसर्गिक उपचारांची सुविधा उपलब्ध होणार आहे. पंचकर्म उपचार पद्धतीद्वारे दीर्घकालीन आजारांवर मुळापासून उपचार मिळतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

उद्घाटनप्रसंगी बोलताना सौ. शुभांगी सुनील मेंढे यांनी आयुर्वेदिक उपचार पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करत, अशा आरोग्यदायी उपक्रमांमुळे समाज अधिक निरोगी व सक्षम होईल, असे मत व्यक्त केले. आमदार राजूभाऊ कारेमोरे यांनीही आयुर्वेद ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी असून, आधुनिक वैद्यकीय उपचारांबरोबरच आयुर्वेदाचा स्वीकार वाढणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले.या कार्यक्रमावेळी डॉ. सुखानी यांनी केंद्रामार्फत उपलब्ध होणा?या विविध आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म थेरपी, जीवनशैली सुधारणा मार्गदर्शन व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा यांची माहिती उपस्थितांना दिली. नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी हे केंद्र एक विश्वासार्ह आधार ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुखानी कुटुंबीयांचे विशेष योगदान लाभले. उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्व उपस्थित मान्यवरांनी या नव्या आरोग्यदायी उपक्रमासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

## जि. प. शाळा सोमनाळा बूज येथे हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** पवनी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या सोमनाळा बूज येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांसाठी विविध मनोरंजक व कौशल्याधारित स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर हितगुज साधण्यात आली. शाळेत लोकवर्गणी मधून झालेल्या कामांची महिला मंडळींनी पाहणी करून कौतुक केले व सुरू असलेल्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला ग्रामपंचायतीच्या सरपंच ममता गिरडकर, माजी सरपंच रेखा भोवते, ग्रामपंचायत सदस्य मनोरमा वैद्य, रसिका गजभिये, रजनी मेश्राम, दुर्गा डाखोरे, शाळा व्यवस्थापन समितीच्या माजी उपाध्यक्ष अस्मिता देशमुख, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मनिषा डाखोरे, मंदा वंजारी, संगीता रेवतकर, कुंभरे यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धांतील विजेत्या महिलांना शाळेचे मुख्याध्यापक हरिदास घावळे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमामुळे महिलांमध्ये आनंद, आपुलकी व सामाजिक एकोप्याचे वातावरण निर्माण झाले.

हळदी-कुंकू कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षिका प्रतीक्षा शेंगुळे, माया दौंड, छबू दिगंबर वंजारी, दिपक वैरागडे, योगेश बोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन प्रतीक्षा शेंगुळे, प्रस्ताविक माया दौंड यांनी तर आभारप्रदर्शन छबू वंजारी हिने मानले.

## वसंत पंचमी निमित्त शिवपार्वती मंदिरात रामजागृती व दहीकाला उत्साहात

### विलास गोपाले यांच्या हस्ते उद्घाटन

युवाराष्ट्र दर्शन / **गर्रा/बघेडा :** वसंत पंचमी या पावन पर्वानिमित्त आष्टी येथील शिवपार्वती मंदिर (लोभी रोड) येथे ह. भ. प. फुलचंदजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली रामजागृती व दहीकाला कार्यक्रम अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात व मोठ्या उत्साहात पार पडला. हा धार्मिक कार्यक्रम स. आनंदीजी गोपाले यांच्या शेतामध्ये आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाची सुरुवात रामजागृतीने झाली. यावेळी महिला भजन मंडळ, आष्टी यांच्या सुमधुर भजनांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ह. भ. प. शिवप्रकाशजी गोपाले, ह. भ. प. तुळशीदासजी नोनारे व ह. भ. प. रूपलताबाई गोपाले यांच्या पवित्र हस्ते रामजागृतीचा विधी पार पडला. संतवाणी, अभंग व भजनांच्या माध्यमातून रामनामाचा गजर करण्यात आला. यानंतर पारंपरिक पद्धतीने दहीकाला कार्यक्रम पार पडला.

## श्री राम अयोध्याच्या अभिषेक निमित्त गोबरवाही येथे भजन आणि हनुमान चालीसाचे आयोजन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** तालुक्यातील गोबरवाही येथे श्री राम अयोध्या मंदिराच्या अभिषेक प्रसंगी, गोबरवाही येथील बावडी हनुमान मंदिरात राधे राधे महिला भजन मंडळातर्फे हनुमान चालीसा आणि भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमात गीता मिश्रा, अरुणा खोब्रागडे, कविता पालीवाल, हर्षा गासौने, सीता पालीवाल, वंदना पालीवाल, पुष्पा मिश्रा, गुंजन पालीवाल, बबिता वरकडे, सविता शेंडे, श्याम रंगा, वैशाली गायधने, उर्मिला अवथरे, नितु वाधवानी, अनिता वाधवानी पदमा तिवारी, हिरा जैन, प्रतिभा जैन आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जुगल किशोर बघेल, ब्रिजमोहन मिश्रा, शरद खोब्रागडे, कृष्णा अग्रवाल, जयप्रकाश रंगा, राजेश पालीवाल, कमलाकर ट्रेलर, पलाश रंगा, गणेश शिवणे यांनी सहकार्य केले. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## तलवारीच्या धाकावर दहशत पसरविण्याचा प्रयत्न

**भंडारा :** शहरातील संताजी वार्डात दोन तरुण हातात तलवार घेऊन दहशत पसरवित असल्याची माहिती भंडारा पोलिसांना मिळताच पोहवा तुमाने यांनी संताजी वार्डात जाऊन पाहिले असता आरोपी कार्तिक भंडारी (२७) व सागर करकाडे (२५) हे दि. १९ जानेवारी रोजी रात्री ११.३० वाजता दरम्यान हातात धारदार शस्त्र घेऊन लोकांना शिवीगाळ करून धमकी देऊन दहशत पसरविताना दिसून आले. पोलिसांनी दोघांनाही धारदार शस्त्रासह ताब्यात घेऊन त्यांचेविरूध्द भंडारा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

